उपविभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी कार्यालय, भोकरदन
जुनी प्रशासकीय इमारत, भोकरदन

दुरध्वनी क्रमांकः 02485-244600 इमेल आयडीः sdmbhokardan103@gmail.com

जा.क्र.2025/पो.पा./आस्था/
दिनांक 15 सप्टेंबर, 2025

**जालना जिल्हयातील, भोकरदन उपविभागातील परिशिष्ट अ प्रमाणे रिक्त असलेली पोलीस पाटील पदे भरणेबाबत**

जालना जिल्हयातील भोकरदन उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील गावात पोलीस पाटील पदभरतीसाठी अर्हताधारक उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीने https://jalnapp.recruitonline.in या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अ)**

| **अ.क्र.** | **करावयाची कार्यवाही** | **दिनांक** |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | 15/09/2025 वेळ सकाळी 10.00 वा. पासून |
| 2 | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत | 30/09/2025 वेळ 23.59 वा. पर्यंत |
| 3 | पात्र / अपात्र उमेदवारांचे अर्जाची छाननी करुन यादी प्रसिध्द करणे | 01/10/2025 ते 02/10/2025 |
| 4 | पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र निर्गमीत करणे (संबंधीत उमेदवारानी संकेतस्थळावरुन प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावेत) | 06/10/2025 ते 12/10/2025 |
| 5 | लेखी परिक्षा | 12/10/2025 |
| 6 | प्रथम उत्तर तालिका (First Answer key) प्रसिध्द करणे | 12/10/2025 सायंकाळी |
| 7 | प्रश्नपत्रिकेतील प्रश्नाबाबत व उत्तर तालिका (Answer key) बाबत लेखी आक्षेप व हरकती सादर करणे | 13/10/2025 स.10.00 ते सायं.06.00 वाजेपर्यंत उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे समक्ष उपस्थित राहून |
| 8 | अंतिम उत्तर तालीका (Final Answer key) प्रसिध्द करणे | 14/10/2025 सकाळी 10.00 |
| 9 | लेखी परिक्षेचा निकाल प्रसिध्द करणे | 14/10/2025 |
| 10 | **मुलाखतीचे वेळापत्रक यथावकाश कळविण्यात येईल.** | |

**परिक्षा शुल्क खालील प्रमाणे विहित पध्दतीने भरावे लागेल.**

| | |
|---|---|
| खुला प्रवर्ग -रुपये 800/- | **संकेतस्थळावर अर्ज भरतांना त्याच वेळी परिक्षा शुल्क ऑनलाईन अदा करणे बंधनकारक रा हील.** |
| आरक्षीत /आर्थीक दुर्बल घटक प्रवर्गासाठी -रुपये 600/- | |

सरळसेवा भरती प्रक्रीयेची सविस्तर जाहीरात https://jalnapp.recruitonline.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. अर्जदाराने संपुर्ण प्रक्रीया काळजीपुर्वक समजून ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. पोलीस पाटील पदाचे परिक्षेचे अर्ज व परिक्षा शुल्क फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील. इतर कोणत्याही प्रकारे परिक्षा शुल्क स्विकारण्यात येणार नाही. सदर ऑनलाईन अर्ज दिनांक 30/09/2025 पर्यंत

सायंकाळी 23.59 पर्यंत सादर करावा. प्रस्तुत पदाकरीता केवळ उक्त संकेतस्थळावर विहीत ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिया दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रीयेच्या माहितीबाबत अद्यावत व जागृत राहण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील. भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत करण्यात येणार नाही.

भरती प्रक्रिया परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे पदाच्या एकूण व आरक्षण प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार संबंधीत उपविभागीय दंडाधिकारी यांनी राखून ठेवले असून त्यांचा निर्णय अंतिम असेल, याची सर्वांनी नोंद घ्यावी. संबंधीत उपविभागातील पोलीस पाटलांची मंजूर पदे, रिक्त पदे, तसेच 30% महिलांसाठी आरक्षित ठेवलेली पदे विचारात घेवून सद्यस्थितीत जी पदे भरणे आवश्यक आहे, त्याबाबतची उपविभागनिहाय माहिती सोबत जोडलेले **परिशिष्ट अ** मध्ये दर्शविलेली आहे.

**ब)**

**<u>पोलीस पाटील पदासाठी किमान आवश्यक अर्हता :-</u>**

1) अर्जदार हा किमान दहावी (एस. एस. सी) उतीर्ण असणे आवश्यक आहे.

2) (अ) वयोमर्यादेकरीता अर्जदाराचे दिनांक 30/09/2025 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.

(ब) अर्जदाराचे वय दिनांक 30/09/2025 रोजी 25 वर्षा पेक्षा कमी नसावे व 45 वर्षा पेक्षा जास्त नसावे.

(क) पोलीस पाटील पदांकरीता वयोमर्यादा शिथिलक्षम नाही.

3) अर्जदार हा संबंधीत गावचा स्थानिक व कायम रहिवाशी असावा. (तहसिल कार्यालयाकडील वय व अधिवास प्रमाणपत्र आवश्यक)

4) अर्जदाराने अर्जामध्ये स्वतःचा आधार क्रमांक व मोबाईल क्रमांक नमूद करवा.

5) अर्जदार शारीरिकदृष्टया **सक्षम असावा** व अर्जदाराचे **चारित्र्य निष्कलंक असणे आवश्यक** आहे.

6) महाराष्ट्र राज्य सेवा (लहान कुटुंबातील प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटुंबाची अर्हता धारण करणे आवश्यक आहे.(अर्जदार याची अर्हता दिनांकास दोन पेक्षा जास्त अपत्य नसावेत.)

7) प्रवर्ग निहाय आरक्षित पदाकरीता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिकारी याने निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

8) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ व भज-ब, क, ड, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग या प्रवर्गातील अर्जदार यांना सन 2025-26 या कालावधीकरीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे दिनांक 30.09.2025 किंवा त्यापुर्वी निर्गमित केलेले (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

9) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) करीता आरक्षीत जागेसाठी वर्ष 2025-26 चे तहसिलदार यांनी दिनांक 30.09.2025 किंवा त्यापुर्वी निर्गमित केलेले महाराष्ट्र राज्याचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

10) सर्व आवश्यक कागदपत्र व पात्रता निकषांसाठी अर्हता दिनांक ही 30.09.2025 ही राहील.

**क)**

**<u>परिक्षेचे स्वरुप :-</u>**

| अ.क्र. | पदनाम संवर्ग | परिक्षेचे गुण | | |
|---|---|---|---|---|
| 1 | पोलीस पाटील | लेखी परिक्षा | तोंडी | एकुण गुण |

| | | | परिक्षा (मुलाखत) | |
|---|---|---|---|---|
| | | 80 | 20 | 100 |

**लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप साधारणपणे खालील प्रमाणे राहील :-**

1. पोलीस पाटील पदाची लेखी परिक्षा 80 गुणांची असेल. प्रत्येक प्रश्न एक गुणाचा राहील, लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

2. लेखी परिक्षा इयत्ता दहावी (एस. एस. सी.) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारित असेल यात सामान्य ज्ञान, गणित, स्थानिक परिसराची

माहिती, व चालु घडामोडी इत्यादी विषयाचा समावेश असेल.

3. **तोंडी परीक्षेकरीता किमान गुण**

पोलीस पाटील भरती / निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 80 गुणांच्या लेखी परीक्षेत किमान 36 गुण (45%) प्राप्त करणारे उमेदवार तोंडी

परीक्षेस पात्र ठरतील.

4. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिम/2010/2009/प्र.क्र.66/10/13-अ दिनांक 16/06/2010 मधील तरतुदीनुसर

लेखी परिक्षा घेतेवेळी उत्तरपत्रिकेवर चिन्हांकित करण्यासाठी फक्त **काळया शाईचा बॉलपेन वापर करावा** लागेल.

**ड)**

**निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती:-**

1. प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी अर्जदारांस शैक्षणिक पात्रता व इतर संबंधीत मुळ प्रमाणपत्र तपासणीसाठी मुदतीत उपलब्ध करून द्यावे लागतील, अन्यथा अंतिम निवडीसाठी त्याचा विचार केला जाणार नाही.
2. लेखी परिक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांचे जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मुळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता अंतरीम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या अर्जदाराची जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क कागदपत्रांच्या आधारे परिपुर्ण सिध्द होईल अशाच अर्जदाराचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमुद केलेली संपुर्ण अर्हता अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होवू शकेल.
3. अर्जदार शारिरीकदृष्ट्या सक्षम असल्याबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक जालना यांचे अथवा सक्षम वैद्यकिय अधिका-यांचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैद्यकिय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.
4. अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे संबंधीत पोलीस स्टेशनचे चारित्र्य प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
5. अर्जदारांचे कोणत्याही राजकिय पक्षाशी संबंध नसावा त्याचप्रमाणे इतर ठिकाणी संपूर्ण वेळ नोकरी करणारा नसावा. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत सदस्य नसावा. तसेच खाजगी किंवा निमसरकारी संस्थेचा सदस्य नसावा अथवा पुर्णवेळ नोकरी करणारा नसावा याबाबतचे रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
6. पोलीस पाटील पदावरील नियुक्तीकरीता मृत / सेवानिवृत पोलीस पाटलांच्या वारसांनी अर्ज केल्यास त्याला प्राधान्य देण्यात येईल. परंतु याचा अर्थ एकाच स्थानासाठी (Position) पोलीस पाटलांच्या वारसांसह दोन किंवा अधिक अर्जदारांना समान गुण मिळाल्यास पोलीस पाटलांच्या वारसांची निवड करण्यास प्राधान्य देण्यात येईल. परंतु तो महाराष्ट्र ग्रामपोलीस पाटील (सेवा, प्रवेश, पगार भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती)

आदेश 1968 व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार आरक्षि त गावांसाठी ठरविण्यात आलेल्या वर्गाचा असला पाहिजे.

7. अर्जदार संबंधीत गावचा स्थानिक व कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
8. अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक / कायमचा रहिवासी असू शकतो. सबब अर्जदाराने अशाच एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातुन केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.
9. प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकिय निकषानुसार आरक्षित करण्यात आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासून अर्ज करावा. (आरक्षणा व्यतिरिक्त असलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नये)
10. **जालना जिल्ह्यातील पोलीस पाटील पदभरती 2025 ची परीक्षा जिल्हा स्तरावर एकाच दिवशी व वेळी घेण्यात येईल.**
11. संपूर्ण भरती प्रक्रीया गाव निहाय होणार असून कोणत्याही दोन गावाच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.
12. पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही.
13. पोलीस पाटलांना क्षेत्रिय स्तरावर (Field work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्ती ही शारीरिक दृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना दिव्यांगसाठीचे आरक्षण लागु करण्यात आलेले नाही.
14. पोलीस पाटील हे पद एका गावात एकच असते त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त माजी सैनिक, खेळाडू यासारखी समांतर आरक्षणे लागु होत नाहीत.
15. **महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम, 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासुन अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे** (क्रिमीलेअर) वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व., सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे दिनांक 31/03/2026 पर्यंत अथवा चालु आर्थीक वर्षातील वैध असलेले नॉन क्रिमीलेअर दिनांक 30.09.2025 किंवा त्यापुर्वी निर्गमित केलेले सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉन क्रिमीलेअरचे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर मागास प्रवर्गाना लागू राहील.
16. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दिनांक 28/03/2005 व क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28/03/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्रक सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणा-या उमेदवारांनेही विहीत (अ) नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.
17. लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या अर्जदारास पोलीस पाटील भरती निवडीसाठी घेण्यात येणा-या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परिक्षेस अनुपस्थित राहणारा अर्जदार अंतीम निवडीस अपात्र ठरेल. उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा अर्जदार पोलीस पाटील पदावरील निवडीकरीता पात्र राहील.
18. समान गुण मिळाल्यास अंतिम निवड शासन निर्णय क्र डीव्हीपी-1113/1767/प्र.क्र. 592/ पोल-8, दिनांक 22/08/2014 अन्वये गुणवत्ता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक अर्जदाराला समान गुण मिळाल्यास प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतीम निवड केली जाईल.
    1. पोलीस पाटलांचे वारस, त्यानंतर

2. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे अर्जदार त्यानंतर
3. माजी सैनिक असलेले अर्जदार, त्यानंतर
4. वयाने जेष्ठ असलेले अर्जदार

पोलीस पाटलांच्या वारसामध्ये पती, पत्नी आणि दोन मुले यांचा समावेश त्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नातेवाईकांचा वारस म्हणून विचार करता येणार नाही.

19. याशिवाय महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 व त्यास संलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले आदेश, शासन निर्णय, परिपत्रकांतील नेमणूकीसाठी इतर प्रचलित असलेल्या अटी सुध्दा बंधनकारक असतील.

20. हा जाहीरनामा / जाहिरात प्रसिध्द होण्यापुर्वी ज्या उमेदवारांनी पोलीस पाटील पदांसाठी कोणत्याही प्रकाराचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहे. असे समजण्यात येईल.

21. परीक्षा शुल्क भरणा न करण्यात आलेले अर्ज अपात्र करण्यात येतील.

22. अपात्र अर्जदारास अथवा इतर कोणत्याही परिस्थितीत परिक्षा फी शुल्क परत मिळणार नाही.

**इ)**

**ऑनलाईन (Online) अर्ज करण्याची पध्दत :-**

A. Online अर्ज करणे प्रक्रीयेची थोडक्यात पद्धती खालील प्रमाणे आहे. (विस्तृत माहितीसाठी संकेतस्थळावरील 'अर्ज कसा भरावा' पहावे.)

B. प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

C. उमेदवाराला ऑनलाईन अर्ज https://jalnapp.recruitonline.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळा वरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

D. अर्जदार यांनी सदर संकेतस्थळावर प्रथम लॉगिन आयडी व पासवर्ड तयार करुन जतन करुन ठेवावा. अर्जदार यांनी फॉम भरताना गावाचे नाव, आरक्षण याची खात्री करून अर्ज भरावे. अर्ज नाकारल्या गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

E. प्रत्यक्ष अर्ज भरण्यापूर्वी या पदाबाबतीची विस्तृत जाहिरातीचे वाचन करुन त्यातील अटी व शर्ती पडताळून पहाव्यात. सदर विस्तृत जाहिरात https://jalnapp.recruitonline.in वर उपलब्ध आहे.

F. https://jalnapp.recruitonline.in या संकेतस्थळावर 'अर्ज करा या Link वर click करावे. यानंतर संबंधीत पदासाठीचा अर्ज दिसून येईल.

G. यानंतर सर्व रकान्यामध्ये आपली माहिती व्यवस्थित भरावी.

H. उमेदवाराने त्याचा Photo व सही संकेतस्थळावर दिलेल्या तपशीलानुसार Upload करावा. (उमेदवाराने लगतच्या सहा महिन्याच्या कालावधीतील फोटो Upload करावा.)

I. सर्व माहिती भरल्यानंतर continue वर click करावे यामुळे भरलेल्या अर्जाचे पूनर्वलोकन (Review) करता येईल. तर अर्जातील माहिती बदलावयाची असल्यास edit form वर click करावे.

J. पूनर्वलोकनात (Review) सर्व माहिती बरोबर असल्यास Save and Continue वर click करावे.

K. यामूळे अर्जदाराने भरलेली माहिती संकेतस्थळावर Save होईल. उमेदवाराचा Form ID तयार होईल.

L. तयार झालेला Form ID भरतीच्या संपूर्ण प्रक्रीयेत उपयुक्त असल्याने तो उमेदवारांनी सांभाळून ठेवावा.

M. यानंतर उमेदवार आपला परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने UPI- PhonePe, GPay etc.इत्यादीव्दारे QR Code स्कॅन करुन भरणे आवश्यक राहील.

N. ऑनलाईन परीक्षा शुल्क भरल्यानंतर उमेदवारास अर्जाची Print काढता येईल.

O. विहीत वेळेनंतर संकेतस्थळावरून अर्ज भरण्याची प्रक्रीया काढून टाकण्यात येईल.

P. उमेदवाराने संकेतस्थळावर नोंदणी करताना दिलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर (Mobile No.) भरती प्रक्रिये संदर्भात आवश्यक त्या सुचना एमएएस व्दारे दिल्या जातील.

Q. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्यातील माहिती परिपुर्ण भरलेल्या उमेदवाराची स्थिती/ परिक्षा प्रवेशपत्र / वेळापत्रक परिक्षाकेंद्र/बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येईल. जर उमदेवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला मोबाईल क्रमांक चुकीचा / अपूर्ण किंवा मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रीयेदरम्यान त्यादवारे पाठविल्या जाणा-या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच मोबाईल वहनात येणा-या तांत्रिक अडचणीना हे कार्यालय जबाबदार असणार नाही यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रीयेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

R. अर्जदारांनी प्रवेश पत्र दि. 06/10/2025 रोजीपासून Download करुन घ्यावयाचे आहेत.

S. यासाठी उमेदवारांनी https://jalnapp.recruitonline.in या संकेतस्थळावर Login करुन प्रवेशपत्र Download करावे व प्रवेशपत्राची रंगीत प्रत (Color Print ) लेखी परिक्षेच्या दिवशी सादर करावी.

T. उमेदवारांना परिक्षा प्रक्रियेबाबत कोणतीही अडचण असल्यास त्यांना 9689911007 या हेल्पलाईन क्रमांकावर सकाळी 10.00 ते सायंकाळी 06.00 या वेळेत संपर्क साधता येईल.

U. कोणत्याही उमेदवारास पोस्टाव्दारे प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही व प्रवेशपत्राशिवाय परीक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही.

V. लेखी परीक्षा ही जालना मुख्यालयी घेण्यात येईल.

W. लेखी परीक्षा झाल्यावर त्याच दिवशी प्रथम उत्तरतालिका (First Answer key) प्रकाशित केली जाईल. लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नाबाबत आक्षेप असल्यास त्यांनी **लेखी परिक्षेच्या दुस-या दिवशी सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत त्याबाबत लेखी आक्षेप** पुराव्यानिशी समक्ष उपस्थित राहून उपविभागीय अधिकारी कार्यालय जालना येथे दाखल करावा.

X. उमेदवाराने लेखी परीक्षेच्या दिवशी प्रवेशपत्राच्या रंगीत प्रत (Color Copy) सह फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र (आधार कार्ड अनिवार्य राहील) सोबत आणणे आवश्यक आहे. विवाहित महिलेने लग्नानंतर नावात बदल केलेला असल्यास रंगीत प्रवेशपत्र (Color Copy) व आधारकार्डसोबत **नमुना फ** मधील स्वंयघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील. (नमुना फ या जाहिरातीसोबत तसेच संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.)

Y. उमेदवाराने भरलेल्या माहिती आधारे त्यास प्रवेशपत्र देऊन परीक्षेस पात्र करण्यात येईल. तेव्हा अर्जदाराने Online अर्ज भरताना त्यांच्या पात्रतेनुसार अचूक, परिपुर्ण व खरी माहिती भरावी.

Z. Online अर्जासोबत कोणेतही अनावश्यक प्रमाणपत्रे अथवा कागदपत्रे जोडू (upload) नयेत.

AA. उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्याने ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरीम यादी प्रसिध्द करुन मुळ कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारास भरतीच्या कोणत्याही टप्यावर अपात्र करण्याचे अधिकार पोलीस पाटील पदभरती निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

BB. ऑनलाईन पध्दतीने अर्ज अपुर्णतेमुळे नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही.

CC. प्रस्तुत प्रक्रीया ही Online पध्दतीने असल्याने उमेदवाराने माहिती भरताना अचुक / खरी / जी कागदपत्रे / प्रमाणपत्रे उपलब्ध आहेत, अशीच माहिती भरावी. चुकीची / खोटी / दिशाभूल करणारी / अन्य इसमाची अथवा नंतर उशीराने कगदपत्रे / प्रमाणपत्रे उपलब्ध होणारी माहिती भरल्यास व भविष्यात निदर्शनास आल्यास अथवा अशा उमेदवाराची निवड झाल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल व शासनाची फसवणुक केल्या प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, यांची संबंधीतानी गांभिर्यपुर्वक नोंद घ्यावी.

DD. यापुढील सर्व माहिती जसे, पात्र/अपात्र उमेदवारांच्या याद्या विद्यार्थ्यांचे Online प्रवेशपत्र; उमेदवारांची प्राप्त गुणांच्याआधारे यादी अंतिम निवड यादी इ. https://jalnapp.recruitonline.in या संकेतस्थळावरील पोलीस पाटील भरती प्रक्रीया 2025 या शिर्षकाखाली उपलब्ध राहील.

EE. उमेदवाराने उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात अनूचित अथवा बेकायदेशीर कृत्य केल्यास संबंधितावर फौजदारी कारवाई करण्यात येईल.

FF. अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे असणार नाही.

GG. आस्थापनेवरील पद भरतीच्या अनुषंगाने वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सूचनाप्रमाणे आरक्षणाबाबत व इतर सूचनाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व त्या अटी जशास तशा लागू राहतील.

दिनांकः- 15/09/2025

ठिकाणः- भोकरदन

**उपविभागीय दंडाधिकारी**
**तथा अध्यक्ष**
**पोलीस पाटील निवड**
**समिती भोकरदन**

**प्रतिलीपीः**

1. मा. जिल्हादंडाधिकारी जालना यांना माहितीस्तव सविनय सादर
2. उपविभागीय पोलीस अधिकारी, भोकरदन (यांना कळविण्यात येते की, सदर जाहिरात आपले कार्यालयाचे सूचना फलकावर दर्शनी भागात प्रसिध्द करावी.
3. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी जालना (एन. आय.सी.) यांना कळविण्यात येते की, सदर जाहिरात jalna.gov.in या संकेतस्थळावर दिनांक 15/09/2025 रोजी प्रसिध्द करावी.
4. तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार भोकरदन/ जाफ्राबाद यांना सदर जाहिरातीचे जाहीर प्रगटन आपले कार्यालयाचे सुचना फलकावर व संबंधीत गावाच्या चावडीवर प्रसिध्दकरुन अहवाल सादर करणेची दक्षता घ्यावी.
5. गट विकास अधिकारी भोकरदन/जाफ्राबाद यांनी सदर जाहिरातीचे जाहीर प्रगटन आपले अधिनस्त सर्व ग्रामपंचायतीच्या दर्शनी भागात डकवुन अहवाल सादर करावा.

## उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, भोकरदन अंतर्गत पोलीस पाटील पदाचे गावनिहाय आरक्षण

**परिशिष्ट अ**

| अ.क्र. | तालुका | गावाचे नांव | सामाजीक आरक्षणाचा प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1 | भोकरदन | चांदई टेपली | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 2 | जाफ्राबाद | बोरगांव मठ | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 3 | जाफ्राबाद | गाडेगव्हाण | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 4 | भोकरदन | प्रल्हादपुर | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 5 | जाफ्राबाद | चिंचखेडा | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | भोकरदन | जवखेडा खुर्द | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 7 | भोकरदन | तडेगांव | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 8 | भोकरदन | मेहगांव | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 09 | जाफ्राबाद | हिवराकाबली | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 10 | भोकरदन | कोठा दाभाडी | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 11 | जाफ्राबाद | आळंद | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 12 | भोकरदन | निमगांव | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 13 | जाफ्राबाद | हिवराबळी | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 14 | भोकरदन | पिंपळगांव बारव | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 15 | जाफ्राबाद | सावंगी | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 16 | जाफ्राबाद | म्हसरुळ | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 17 | भोकरदन | नळणी बु. | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 18 | भोकरदन | खडकी | S.C- अ.जा. | सर्वसाधारण |
| 19 | भोकरदन | कोठा जाहॅागीर | S.C- अ.जा. | महिला |
| 20 | भोकरदन | थिगळखेडा | S.C- अ.जा. | महिला |
| 21 | जाफ्राबाद | शिराळा | S.C- अ.जा. | महिला |
| 22 | भोकरदन | कुंभारी | S.C- अ.जा. | महिला |
| 23 | जाफ्राबाद | गोंदनखेडा | S.C- अ.जा. | महिला |
| 24 | जाफ्राबाद | तोंडोळी | S.C- अ.जा. | महिला |
| 25 | जाफ्राबाद | देवळे गव्हान | S.C- अ.जा. | महिला |
| 26 | जाफ्राबाद | नांदखेडा | S.C- अ.जा. | महिला |
| 27 | जाफ्राबाद | भारज.खु | S.T- अ.ज. | सर्वसाधारण |
| 28 | भोकरदन | कोठाकोळी | S.T- अ.ज. | सर्वसाधारण |
| 29 | भोकरदन | वाढोणा | S.T- अ.ज. | सर्वसाधारण |
| 30 | भोकरदन | कोदा | S.T- अ.ज. | सर्वसाधारण |
| 31 | भोकरदन | कार्लावाडी | S.T- अ.ज. | सर्वसाधारण |
| 32 | जाफ्राबाद | कुसळी | S.T- अ.ज. | सर्वसाधारण |
| 33 | भोकरदन | जळगांव सपकाळ | S.T- अ.ज. | सर्वसाधारण |
| 34 | भोकरदन | वाडी.खु | S.T- अ.ज. | सर्वसाधारण |
| 35 | भोकरदन | दहीगांव | S.T- अ.ज. | सर्वसाधारण |
| 36 | भोकरदन | आडगांव | S.T- अ.ज. | सर्वसाधारण |
| 37 | भोकरदन | पद्मावती | S.T- अ.ज. | महिला |
| 38 | जाफ्राबाद | सांजोळ | S.T- अ.ज. | महिला |
| 39 | भोकरदन | धोंडखेडा | S.T- अ.ज. | महिला |
| 40 | भोकरदन | वालसावंगी | S.T- अ.ज. | महिला |
| 41 | भोकरदन | आन्वापाडा | S.B.C- वि.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 42 | भोकरदन | वडोद तांगडा | S.B.C- वि.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 43 | जाफ्राबाद | अकोला देव | S.B.C- वि.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 44 | भोकरदन | पळसखेडा पिंपळे | S.B.C- वि.मा.प्र. | महिला |
| 45 | जाफ्राबाद | कोळेगांव | S.B.C- वि.मा.प्र. | महिला |
| 46 | जाफ्राबाद | पासोडी | V.J-A-वि.जा.-अ. | सर्वसाधारण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 47 | जाफ्राबाद | वाढोणा | V.J-A-वि.जा.-अ. | सर्वसाधारण |
| 48 | भोकरदन | इब्राहिमपुर | V.J-A-वि.जा.-अ. | सर्वसाधारण |
| 49 | भोकरदन | तपोवन | V.J-A-वि.जा.-अ. | सर्वसाधारण |
| 50 | भोकरदन | आव्हाना | V.J-A-वि.जा.-अ. | सर्वसाधारण |
| 51 | जाफ्राबाद | गोकुळवाडी | V.J-A-वि.जा.-अ. | महिला |
| 52 | जाफ्राबाद | कोनड | V.J-A-वि.जा.-अ. | महिला |
| 53 | जाफ्राबाद | वडाळा | N.T-B - भ.ज.- ब | सर्वसाधारण |
| 54 | भोकरदन | मासनपुर | N.T-B - भ.ज.- ब | सर्वसाधारण |
| 55 | जाफ्राबाद | माहोरा | N.T-B - भ.ज.- ब | सर्वसाधारण |
| 56 | जाफ्राबाद | सावरगांव म्हस्के | N.T-B - भ.ज.- ब | महिला |
| 57 | जाफ्राबाद | बोरगांव बु | N.T-C - भ.ज.- क | सर्वसाधारण |
| 58 | जाफ्राबाद | देऊळझरी | N.T-C - भ.ज.- क | सर्वसाधारण |
| 59 | जाफ्राबाद | गणेशपुर | N.T-C - भ.ज.- क | सर्वसाधारण |
| 60 | जाफ्राबाद | वरुड खु. | N.T-C - भ.ज.- क | सर्वसाधारण |
| 61 | भोकरदन | बाभुळगांव | N.T-C - भ.ज.- क | सर्वसाधारण |
| 62 | भोकरदन | बामखेडा | N.T-C - भ.ज.- क | महिला |
| 63 | भोकरदन | लिंगेवाडी | N.T-C - भ.ज.- क | महिला |
| 64 | जाफ्राबाद | किन्ही | NT-D - भ.ज - ड | सर्वसाधारण |
| 65 | भोकरदन | फत्तेपुर | NT-D - भ.ज - ड | सर्वसाधारण |
| 66 | भोकरदन | सावंगी अवघडराव | NT-D - भ.ज - ड | सर्वसाधारण |
| 67 | भोकरदन | शेलुद | NT-D - भ.ज - ड | महिला |
| 68 | जाफ्राबाद | वरखेडा फिरंगी | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| 69 | भोकरदन | जयदेववाडी | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| 70 | भोकरदन | कठोरा जैनपुर | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| 71 | भोकरदन | धावडा | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| 72 | भोकरदन | नांजा | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| 73 | भोकरदन | कोसगांव | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| 74 | भोकरदन | वरुड बु. | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| 75 | जाफ्राबाद | घानखेडा | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| 76 | जाफ्राबाद | आरदखेडा | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| 77 | भोकरदन | बोरगांव तारु | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| 78 | भोकरदन | निंबोळा | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| **79** | जाफ्राबाद | वरुड बु | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| **80** | भोकरदन | दानापुर | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| **81** | जाफ्राबाद | डोणगांव | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| **82** | जाफ्राबाद | धोंडखेडा | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| **83** | भोकरदन | खामखेडा | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| **84** | भोकरदन | सिरगांव वाघ्रुळ | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| **85** | भोकरदन | गोषेगांव | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| **86** | जाफ्राबाद | चापनेर | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 87 | जाफ्राबाद | बेलोरा | OBC - इ.मा.व. | सर्वसाधारण |
| 88 | भोकरदन | आन्वा | OBC - इ.मा.व. | महिला |
| 89 | भोकरदन | चांदई ठोंबरी | OBC - इ.मा.व. | महिला |
| 90 | भोकरदन | गोद्री | OBC - इ.मा.व. | महिला |
| 91 | भोकरदन | चिंचोली | OBC - इ.मा.व. | महिला |
| 92 | भोकरदन | सिपोरा बाजार | OBC - इ.मा.व. | महिला |
| 93 | भोकरदन | देउुळगांव ताड | OBC - इ.मा.व. | महिला |
| 94 | जाफ्राबाद | सवासनी | OBC - इ.मा.व. | महिला |
| 95 | भोकरदन | देऊळगांव कमान | OBC - इ.मा.व. | महिला |
| 96 | भोकरदन | दावतपुर | OBC - इ.मा.व. | महिला |
| 97 | जाफ्राबाद | सोनगिरी | SEBC सा.शै.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 98 | जाफ्राबाद | खापरखेडा | SEBC सा.शै.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 99 | जाफ्राबाद | आंबेगांव | SEBC सा.शै.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 100 | जाफ्राबाद | विरखेडा भालकी | SEBC सा.शै.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 101 | जाफ्राबाद | गोपी | SEBC सा.शै.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 102 | भोकरदन | वाकडी | SEBC सा.शै.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 103 | जाफ्राबाद | नळविहिरा | SEBC सा.शै.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 104 | जाफ्राबाद | तापोवन गोंधन | SEBC सा.शै.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 105 | जाफ्राबाद | हनुमंतखेडा | SEBC सा.शै.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 106 | जाफ्राबाद | निवडुंगा | SEBC सा.शै.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 107 | जाफ्राबाद | डावरगांव | SEBC सा.शै.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 108 | जाफ्राबाद | दहीगांव | SEBC सा.शै.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 109 | जाफ्राबाद | काचनेरा | SEBC सा.शै.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 110 | भोकरदन | मलकापुर | SEBC सा.शै.मा.प्र. | सर्वसाधारण |
| 111 | जाफ्राबाद | भराडखेडा | SEBC सा.शै.मा.प्र. | महिला |
| 112 | जाफ्राबाद | रास्तळ | SEBC सा.शै.मा.प्र. | महिला |
| 113 | जाफ्राबाद | देऊळगाव उगले | SEBC सा.शै.मा.प्र. | महिला |
| 114 | जाफ्राबाद | पिंपळखुटा | SEBC सा.शै.मा.प्र. | महिला |
| 115 | जाफ्राबाद | निमखेडा खु. | SEBC सा.शै.मा.प्र. | महिला |
| 116 | जाफ्राबाद | खानापुर | SEBC सा.शै.मा.प्र. | महिला |
| 117 | भोकरदन | तळणी | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 118 | जाफ्राबाद | पापळ | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 119 | जाफ्राबाद | बोरखेडी चिंच | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 120 | जाफ्राबाद | हारपाळा | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 121 | जाफ्राबाद | सावखेडा गोंदन | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 122 | भोकरदन | करजगांव | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 123 | भोकरदन | मेरखेडा | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 124 | भोकरदन | पिंपळगांव सुतार | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 125 | भोकरदन | भोरखेडा | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 126 | भोकरदन | पिंपळगांव थोटे | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 127 | भोकरदन | सुभानपुर | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 128 | भोकरदन | उमरखेडा | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 129 | जाफ्राबाद | खामखेडा | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 130 | भोकरदन | टाकळी हिवर्डी | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 131 | जाफ्राबाद | निमखेडा बु. | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 132 | भोकरदन | मुठाड | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 133 | भोकरदन | पेरजापुर | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण |
| 134 | भोकरदन | पंढरपुरवाडी | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | महिला |
| 135 | भोकरदन | भिवपुर | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | महिला |
| 136 | भोकरदन | वडशेद | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | महिला |
| 137 | भोकरदन | खापरखेडा | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | महिला |
| 138 | भोकरदन | ईटा | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | महिला |
| 139 | भोकरदन | पोखरी | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | महिला |
| 140 | भोकरदन | राजुर | EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | महिला |
| 141 | भोकरदन | कोदोली | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 142 | भोकरदन | टाकळी भोकरदन | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 143 | जाफ्राबाद | भातोडी | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 144 | जाफ्राबाद | सिपोरा अंभोरा | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 145 | भोकरदन | जोमाळा | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 146 | जाफ्राबाद | ब्रम्हपुरी | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 147 | भोकरदन | वालसा डावरगांव | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 148 | जाफ्राबाद | येवता | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 149 | भोकरदन | नळणी खु | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 150 | भोकरदन | बेलोरा | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 151 | भोकरदन | गव्हाण संगमेश्वर | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 152 | भोकरदन | जवखेडा बु. | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 153 | भोकरदन | वजीरखेडा | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 154 | भोकरदन | लतीफपुर | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 155 | भोकरदन | बरंजळा लोखंडे | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 156 | भोकरदन | आलापुर | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 157 | भोकरदन | मालखेडा | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 158 | जाफ्राबाद | कुंभारझरी | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 159 | भोकरदन | सोयगांव देवी | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 160 | भोकरदन | सिरसगांव | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 161 | भोकरदन | बरंजळा साबळे | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 162 | जाफ्राबाद | काळेगांव | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 163 | भोकरदन | हिसोडा खुर्द. | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 164 | भोकरदन | कोपर्डा | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 165 | भोकरदन | जवखेडा ठोंबरी | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 166 | भोकरदन | ताडकळस | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 167 | भोकरदन | माळेगांव | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 168 | भोकरदन | गारखेडा | OPEN - खुला | सर्वसाधारण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 169 | भोकरदन | कोळेगांव | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 170 | भोकरदन | पिंपळगांव शेरमुलकी | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 171 | जाफ्राबाद | गारखेडा | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 172 | जाफ्राबाद | आसई | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 173 | जाफ्राबाद | शिंदी | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 174 | भोकरदन | सावखेडा | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 175 | भोकरदन | जानेफळ दाभाडी | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 176 | जाफ्राबाद | डोलखेडा बु. | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 177 | भोकरदन | टाकळी बाजड | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 178 | भोकरदन | क्षिरसागर | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 179 | भोकरदन | पारध खु. | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 180 | भोकरदन | वाडी.बु | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 181 | भोकरदन | गोकुळ | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 182 | भोकरदन | तांदुळवाडी | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 183 | भोकरदन | खादगांव | OPEN - खुला | सर्वसाधारण |
| 184 | भोकरदन | मनापुर | OPEN - खुला | महिला |
| 185 | भोकरदन | देहेड | OPEN - खुला | महिला |
| 186 | भोकरदन | विरेगांव | OPEN - खुला | महिला |
| 187 | भोकरदन | चोऱ्हाळा | OPEN - खुला | महिला |
| 188 | भोकरदन | जानेफळ गायकवाड | OPEN - खुला | महिला |
| 189 | भोकरदन | पळसखेडा ठोंबरी | OPEN - खुला | महिला |
| 190 | भोकरदन | हिसोडा बु. | OPEN - खुला | महिला |
| 191 | भोकरदन | दगडवाडी | OPEN - खुला | महिला |
| 192 | भोकरदन | कठोरा बाजार | OPEN - खुला | महिला |
| 192 | भोकरदन | रेलगांव | OPEN - खुला | महिला |
| 194 | भोकरदन | पळसखेडा मुर्तड | OPEN - खुला | महिला |
| 195 | भोकरदन | बाणेगांव | OPEN - खुला | महिला |
| 196 | भोकरदन | डावरगांव | OPEN - खुला | महिला |
| 197 | भोकरदन | खंडाळा | OPEN - खुला | महिला |
| 198 | भोकरदन | पळसखेडा दाभाडी | OPEN - खुला | महिला |
| 199 | भोकरदन | एकेफळ | OPEN - खुला | महिला |
| 200 | जाफ्राबाद | बोरखेडी गायकी | OPEN - खुला | महिला |
| 201 | भोकरदन | बोरगांव खडक | OPEN - खुला | महिला |

**उपविभागीय दंडाधिकारी**

**तथा अध्यक्ष**

**पोलीस पाटील निवड**

**समिती भोकरदन**

# नमुना फ

# स्वयंघोषणापत्र

# फक्त विवाहीत महिला अर्जदारांसाठी

मी, श्रीमती (लग्नानंतरचे नांव) ---------------------------------------------------राहणार (गावाचे नांव)-----------------ता.------------------जि.जालना येथील रहिवाशी आहे. याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करते की,

1. मी पोलीस पाटील पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
2. माझे लग्नापुर्वीचे नांव श्रीमती----------------------------------------------- असे आहे व लग्नानंतरचे नांव श्रीमती---------------------------------------------------असे आहे.
3. पोलीस पाटील पदाच्या फॉर्मचा आयडी क्रमांक--------------------------------
4. आधार क्रमांक--------------------------------------------------------------

वरील दोन्ही नावाची व्यक्ती मीच असून यात काही तफावत आढळल्यास त्यास सर्वस्वी जबाबदार मी राहील व यामुळे पोलीस पाटील पदासाठी मी अपात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाणः-
दिनांकः-

सही-

संपुर्ण नांव- -----------------------------------

सुचना- 1. सर्व विवाहीत महिलांनी पोलीस पाटील पदासाठी लग्नापुर्वी / लग्नानंतरचे नावाने केलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येतील.

2. उमेदवाराने लेखी परिक्षेच्या वेळेस **रंगीत प्रवेश पत्र (Color Copy )** व आधार कार्ड सोबत सदरचे स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील.

# जाहिर प्रगटन

## जालना जिल्हयातील उपविभागीय दंडाधिकारी भोकरदन यांचे कार्यालय, जिल्हा जालना.

## पोलीस पाटील पदभरतीसाठी जाहिरात 2025

## उपविभाग भोकरदन

जालना जिल्हयातील उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय भोकरदन अंतर्गत गाव पोलीस पाटील पद भरतीसाठी अर्हता धारक उमेदवारांकडून विहित नमुण्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच https://jalnapp.recruitonline.in संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | 15/09/2025 वेळ सकाळी 10.00 वा. पासून |
| ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत | 30/09/2025 वेळ सायंकाळी 23.59 वा. पर्यंत |
| परिक्षा फिस | खुला प्रवर्ग - 800/- रु.<br>मागासप्रवर्गासाठी - 600/- रु |
| लेखी परिक्षा | 12/10/2025 |
| अर्हता | 1. एस.एस.सी (10 वी) उत्तीर्ण<br>2. संबंधीत गावचा रहिवाशी असवा.<br>3. वय दि. 30/09/2025 रोजी अर्जदाराचे वय 25 ते 45 दरम्यान असावे.<br>4. जाहिरातीनुसार इतर आवश्यक कागदपत्रे |

पोलीस पाटील भरती प्रक्रिया संदर्भात सविस्तर जाहिरात https://jalnapp.recruitonline.in संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहिती काळजीपुर्वक वाचुनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदाकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीनेच भरलेले अर्ज व विहित पध्दतीने भरलेल्या प्रक्रिया शुल्कासह ग्राहय धरण्यात येतील इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेची माहिती बाबत अदयावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल.

भरती प्रक्रिया / परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशता बदल करणे, पदाच्या एकुण गावनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट तसेच आरक्षणात बदल करण्याचे अधिकार तसेच प्रक्रिये संदर्भात प्राप्त तक्रारीबाबत निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार संबंधीत उपविभागीय दंडाधिकारी तथा अध्यक्ष, पोलीस पाटील निवड समिती यांना राहील.

दिनांकः 15/09/2025

ठिकाणः- भोकरदन

**उपविभागीय दंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**पोलीस पाटील निवड समिती, भोकरदन**